बीड । महाराष्ट्र
शुक्रवार दि.२७/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२७
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com










## सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

# राष्ट्रवादीची दोरी सुनेत्रा पवारांच्या हाती



मुंबई । वृत्तसेवा

अजित पवार यांच्या जाण्याने नुकसान झालं. अजित पवारांमुळे राज्यात आणि देशात आपली ओळख निर्माण झाली होती, सामान्य कुटुंबातून ते आले होते. २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले, हे सांगण्यात मला कोणतीही अडचण नाही, असे म्हणत राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणाही करण्यात आली आहे. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्याच सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडेही मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

अजित दादा २८ जानेवारी दिवशी आपल्यातून निघून गेले, आपल्या सर्वांसाठी ते धक्कादायक होतं. आपल्या सर्वांना प्रश्न होता उद्या आपण काय करणार, कसं करणार? पण सुनेत्राताईंच्या नेतृत्वात आपला पक्ष काम करेल, असे प्रफुल पटेल यांनी म्हटले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या बैठकीसाठी सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल, पार्थ पवार, रुपाली चाकणकर छगन भुजबळ यांच्यासह अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते. मागच्या महिन्यात आपण पाहिलं की, काहींजण बोलू लागले. आपल्या पक्षात काही संबंध नाही ते काहीही बोलायला लागले, आम्ही काय करायचं ते सांगायला लागले. ▶▶ पान २ वर

### अजित पवारांची आठवण

अजित पवार एका वेगळ्या मातीचेच बनले होते, आपल्यावर अनेक संकटे आली. अजित पवारांनी नेतृत्व हातात घेतल्यानंतर एक वेगळी परिस्थिती निर्माण झाली आपल्याला प्रश्न पडला होता आता आपण पुढे कसं जाणार आहोत. मात्र, अजित पवारांनी कधीही आपला निश्चय कमी होऊ दिला नाही. शेवटी नेता तोच असतो जो लढाईमध्ये पुढे येऊन लढाई लढतो आणि त्यानुसार त्यांनी लढाई लढली, जिंकली. सुनेत्रा पवार, सुनील तटकरे यांना माहिती आहे की, अजित पवारांबाबत काय भावना होती आणि आता नाहीत त्यावेळी काय आहे. सुनेत्रा पवार ज्यावेळी उपमुख्यमंत्री झाल्या त्यावेळी आम्ही संसदेत गेलो त्यावेळी सगळेजण येऊन भेटत होते, त्यांच्या डोळ्यात पाणी होतं, अशी आठवण प्रफुल पटेल यांनी सांगितली.

## वाल्मिक कराडला

# सुप्रिम कोर्टाचा मोठा दणका!



मुंबई । वृत्तसेवा

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येने सगळा महाराष्ट्र हादरला होता. या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याने आपला या प्रकरणाशी संबंध नाही, मला दोषमुक्त करा, माझी जामीनावर सुटका करा यासाठी जंगजंग पछाडले. बीडच्या विशेष न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर वाल्मिकने औरंगाबाद खंडपीठ, मुंबई उच्च न्यायालया आणि थेट सुप्रीम कोर्टापर्यंत धाव घेतली. परंतु या सगळ्या ठिकाणी वाल्मिक कराडच्या पदरी निराशाच आली. गुरूवारी (ता.२६) वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली आणि त्यात देखील त्याचा जामीन अर्ज फेटाळला. त्यामुळे वाल्मिक कराडला मोठा दणका बसला असून आता त्याच्या तुरुंगातून बाहेर येण्याच्या वाटा बंद झाल्या आहेत. बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडच्या जामीनाबाबत सुप्रीम कोर्टाने महत्वाचा निर्णय दिला. वाल्मिक कराडचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला असून न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांच्यासमोर आज वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. ▶▶ पान २ वर

# पोलीस पाटील भरती प्रक्रियामधील गैरप्रकारामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती पारदर्शकतेने करायचे ठरवले होते. मात्र काही ठिकाणावरून आलेल्या तक्रारीवरून पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा

### जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल-ॲड.अजित देशमुख

स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे. जिल्ह्यात मोठ्या संख्येने पोलीस पाटील पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी देखील भेटी दिल्या. त्यामुळे परीक्षा पारदर्शकतेने होईल आणि पात्र गोरगरिबांना न्याय मिळेल. पात्र व्यक्ती निवडले जातील, अशी आशा होती. मात्र काही ठिकाणच्या ▶▶ पान २ वर

# बारगजवाडीत मध्यरात्री चोरट्यांनी फोडले घर

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील बारगजवाडी येथील घराची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण १,६८,२१० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवार (दि.२२)रोजी मध्यरात्री घडली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून चोरीच्या

### १ लाख ६८ हजारांचा ऐवज लंपास

घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असून पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. शिरूर कासार तालुक्यातील बारगजवाडी येथील रहिवाशी असलेल्या द्रोपदाबाई बाळासाहेब मिसाळ (वय ७०) ▶▶ पान २ वर

# श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे शिवजयंतीनिमित्त व्याखान



राजुरी । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे शुक्रवारी प्रा.यशवंत गोसावी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे गेल्या नऊ वर्षांपासून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षी शुक्रवार दि.२७/०२/२०२६ रोजी सकाळी ११ वा. श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती प्रेममुर्ती महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, ▶▶ पान २ वर

# भरदिवसा महिलेच्या गळ्यातील दागिने लंपास

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील केरूळ येथील एका महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे मिनी गंठण अज्ञात दोन चोरट्यांनी भरदिवसा लंपास केल्याची घटना बुधवार (दि.२५)रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास शेरी पुलावर घडली असून या झटापटीत महिला स्कुटीवरून पडल्याने नातीसह जखमी झाली आहे. बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर सोनसाखळी चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे असून आष्टी तालुक्यातील केरूळ येथील एक महिला आपल्या नातीला कडा येथील दवाखान्यात दाखवण्यासाठी स्कुटीवरून आली होती. ▶▶ पान २ वर

## राज्याच्या विकासावर

# आ.नमिता मुंदडा यांचे प्रभावी भाष्य



मुंबई । वृत्तसेवा

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी राज्याच्या आर्थिक प्रगतीसह विविध लोकहितकारी विषयांवर आपली भूमिका मांडली. मुंबई येथील विधिमंडळ सभागृहात झालेल्या या चर्चेदरम्यान त्यांनी कृषी, उद्योग, पायाभूत सुविधा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांतील शासनाच्या धोरणांचे स्वागत करत मतदारसंघासह राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मागण्या सादर केल्या. आमदार मुंदडा यांनी आपल्या भाषणात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या हिताच्या मुद्द्यांवर भर दिला. राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न सुरक्षित करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना आणि किमान आधारभूत किमतीनुसार ▶▶ पान २ वर

# चला कागदोपत्री झाडे लावूया, विश्वविक्रम करूया-डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील हरित बीड अभियान अंतर्गत वृक्षलागवड प्रकरणात वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहात दिलेल्या माहितीतून दिशाभूल केल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि.२६ रोजी लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. या वेळी आंदोलनकर्त्यांनी कागदावर झाडांची चित्रे काढत चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया असा उपरोधिक संदेश देत प्रशासनाच्या दाव्यांचा निषेध केला. निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत वनमंत्री गणेश नाईक, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना पाठविण्यात आले. आंदोलनात रामनाथ जमाले,शेख युनुस, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), सय्यद सादेक ▶▶ पान २ वर



## संपादकीय

# केरळचे नवे नामकरण

केंद्र सरकारने नुकताच एक मोठा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नवीन कार्यालय सेवातीर्थमध्ये मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळाने केरळ सरकारचा राज्याचे नाव बदलून 'केरळम' करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. केरळच्या राज्य सरकारने या संदर्भातील प्रस्ताव केंद्राकडे पाठवला होता. त्याला आता केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. कोणत्याही नव्या नामकरणासंदर्भात 'नावात काय आहे' असा प्रश्न उपस्थित केला जातो, परंतु अखेर 'नावात सारे काही आहे' असे म्हणावे लागते. केरळमध्ये एप्रिल–मे महिन्यात होणा–या राज्याच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. राज्याच्या सांस्कृतिक आणि भाषिक ओळखीचा आदर करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे सरकारने म्हटले आहे. केरळचे नाव बदलून केरळम करण्यासाठी केरळ विधानसभेने २४ जून २०२४ रोजी एकमताने एक ठराव मंजूर केला होता. यामध्ये केंद्र सरकारला राज्याचे नाव 'केरळ'वरून 'केरळम' असे करण्याची विनंती केली होती. यापूर्वी असाच एक ठराव मंजूर करून ऑगस्ट २०२३ मध्ये केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता. केंद्रीय गृहमंत्रालयाने या प्रस्तावाचा आढावा घेतला आणि काही तांत्रिक बदल सुचवले. त्यानंतर राज्य विधानसभेने सुधारित ठराव पुन्हा मंजूर केला, जो आता केंद्र सरकारने मंजूर केला आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी हा प्रस्ताव मांडला होता. केरळम हा राज्याचा मूळ आणि स्थानिक उच्चार आहे. तो राज्याची सांस्कृतिक ओळख चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित करतो, असा युक्तिवाद त्यांनी प्रस्ताव सादर करताना केला होता. केरळ विधानसभेने एकमताने ठराव मंजूर करून केंद्राकडे पाठवला होता. मल्याळम भाषेत राज्याला 'केरळम' असे संबोधले जाते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३ नुसार राज्याचे नाव बदलण्याची प्रक्रिया केली जाते. भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती झाल्यापासून केरळचे नाव केरळम करावे अशी मागणी होत होती. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, केरळचे नाव बदलण्याचे विधेयक आता राज्य विधानसभेत मंजुरीसाठी पाठवले जाईल. नवीन पंतप्रधान कार्यालय इमारतीत झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत १.४ अब्ज लोकांच्या हिताचे सर्व निर्णय घेण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या वर्षाच्या सुरुवातीला भारतीय जनता पक्षाचे केरळ प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांनीही पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहून राज्याचे अधिकृत नाव 'केरळ'वरून 'केरळम्' करण्याची मागणी केली होती. आता हे नाव बदलण्यासाठी संसदेत एक घटनादुरुस्ती प्रस्ताव मांडला जाईल. आता काही जण असाही प्रश्न उपस्थित करतात की केरळम हे खरोखरच राज्याचे स्वत:चे नाव आहे की ते राजकीय सोयीसाठी बनवले जात आहे? राज्याचे ते स्वत:चे नाव असेल तर या शब्दाचा अर्थ काय? स्वातंत्र्यापूर्वी जेव्हा भारत मुघल आणि ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली होता, तेव्हा केरळला काय म्हटले जायचे असाही प्रश्न केला जातो. त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला असता असे दिसून येते की, केरळ हे नाव खूप प्राचीन मानले जाते. सम्राट अशोकाच्या तिस–या शतकातील शिलालेखांमध्ये 'केरळपुत्र' असा उल्लेख आढळतो. केरळमध्ये राहणा–या लोकांसाठी तो वापरला जात असे. संगम साहित्यात 'चेरल' किंवा 'केरळ' सारखे शब्द आढळतात. 'केरळ' हा शब्द दोन शब्दांपासून बनलेला आहे. 'केरळ' म्हणजे नारळ आणि 'आलम' म्हणजे जमीन. केरळ ही अरबी समुद्राच्या काठावरील एक लांब पट्टी, जिथे नारळाची झाडे मुबलक प्रमाणात आढळतात. म्हणून 'केरळ' हे नाव त्याला चपखल बसते. काही इतिहासकारांचे म्हणणे असे की, 'केरळ' हा शब्द चेर राजवंशाच्या काळात वापरात आला. त्या काळात चेर राजवंशाच्या अंतर्गत असलेल्या भागात राहणा–या लोकांना केरळचे रहिवासी म्हटले जात असे. यावरून हे स्पष्ट होते की, 'केरळ' हे नाव एका व्यक्तीने तयार केलेले नाही, तर प्राचीन ऐतिहासिक आणि सांस्कृतिक विकासाचा तो परिणाम आहे. १ नोव्हेंबर १९५६ रोजी केरळ राज्याची निर्मिती झाली. तत्पूर्वी हा प्रदेश वेगवेगळ्या प्रशासकीय विभागात विभागला गेला होता. ब्रिटिश राजवटीत ते तीन भागांमध्ये विभागले गेले होते. एका प्रदेशाला मलबार प्रदेश असे संबोधले जायचे. याला मद्रास प्रेसिडेन्सीचा भाग मानला जात असे. राज्याचा दुसरा भाग त्रावणकोर. स्थानिक राजाच्या आधिपत्याखाली तो होता. नाममात्र स्वायत्त असूनही ते ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली होते. तिसरा प्रदेश म्हणजे कोचीन राज्य. स्वातंत्र्यानंतर १९४९ मध्ये त्रावणकोर आणि कोचीन यांचे विलीनीकरण करून त्रावणकोर –कोचीन हे नवीन राज्य तयार करण्यात आले. मलबार प्रदेश मद्रास राज्याचा भाग राहिला. पण लोकांना ते आवडले नाही. त्यांनी सर्व मल्याळम भाषिक क्षेत्राचे एकत्रीकरण करून एक नवीन राज्य स्थापन करण्याची मागणी केली. इतर राज्यांमध्येही अशाच मागण्या सुरू होत्या. त्यामुळे भाषिकवार प्रांत रचना करण्यासाठी एक आयोग स्थापन करण्यात आला. आयोगाच्या शिफारशीनुसार तिन्ही प्रदेशांचे विलीनीकरण करून केरळ राज्याची स्थापना करण्यात आली. केंद्रात जेव्हापासून एनडीएचे सरकार आले आहे तेव्हापासून अनेक राज्यांत शहरांची नावे बदलण्यात आली आहेत. केंद्र सरकारच्या या भूमिकेवर टीकाही झाली आहे. मात्र आता केंद्राने देशातील एका राज्याचे नाव बदलण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे त्या राज्यात भाजपला तसेच मित्रपक्षांना काही फायदा होईल का ते बघावे लागेल. मोदी सरकारने केरळचे नाव बदलून केरळम करण्यास लगेच मंजुरी दिली. मात्र, आम्ही पश्चिम बंगालचे नाव बदलून 'बांग्ला' करण्याबाबत सातत्याने विनंती करून देखील जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत आहे अशी टीका पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. भाजप आणि माकप (डावे) यांची आघाडी बळकट होत असल्यामुळेच केरळच्या नामांतराचा प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. एक दिवस भाजपची सत्ता जाईल आणि तेव्हा आम्ही पश्चिम बंगालचे नाव बदलू, असा दावा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला. नावात काय नाही  नावात सारे काही आहे!

# गेवराईची माती सामाजिक मोती पिकवणारी–दत्ता बारगजे

## सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या रत्नांना सोबत घेवून काम करणार–गिताभाभी पवार

**गेवराई ।** प्रतिनिधी



गेवराईच्या मातीमध्ये सामाजिक कार्यात काम करणारे मोती पिकवण्याची ताकत आहे आणि हे मोती समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये उल्लेखनिय काम करत असून आगामी पाच वर्षात गेवराई शहरात असे पाच दहा हजार समाजसेवक निर्माण होणार असल्याचे मत इन्फंटचे दत्ता बारगजे यांनी गेवराई येथील सामाजिक धान्य बँकेच्या वतीने आयोजित संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त सेवारत्न पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी केले. समाजसेवेचा वसा घेतलेल्या आणि प्रतिकूल परिस्थितीतही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा दि. २३ फेब्रुवरी रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न पुरस्कारा'ने गौरव करण्यात आला. संघर्ष सामाजिक धान्य बँक आयोजित पुरस्कार सोहळा जि.प.प्राथमिक शाळा गेवराई येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आनंदग्रामचे दत्ता बारगजे व प्रमुख उपस्थिती म्हणून नगराध्यक्षा गीताभाभी पवार, गटशिक्षणाधिकारी प्रवीणकुमार काळम पाटील, नायब तहसीलदार संजय सोनवणे, रामकुमार राव अग्रवाल, प्रीती संतोष गर्जे, कर्ण तांबे  यांची लाभली होती. यावेळी अध्यक्षीय भाषणात दत्ता बारगजे यांनी संघर्ष धान्य बँकेच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्वच पदाधिकाऱ्यांचे अनेक सामाजिक कामांचे कौतुक केले. तसेच बीड जिल्ह्यात सर्वात जास्त सामाजिक क्षेत्रात काम करणारे लोक गेवराई तालुक्यात असल्याने आपल्याला या बाबीचा खुप अभिमान आहे आणि या लोकांना विश्वासात घेवून काम करणार असल्याचे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या नगराध्यक्षा गिताभाभी पवार यांनी सांगितले. संत गाडगे बाबा जयंतीचे निमित्त साधुन तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यां रत्नांना सेवारत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले यामध्ये माधवराव पवार,धनंजय सुलाखे,नामदेव चौधार, भारत चव्हाण, विकास घोडके, योगेश महाराज गायके,आप्पासाहेब महानोर, शितल साखरे, ज्ञानेश्वर पिंगळे, लातूर पॅटर्न क्लासेस गेवराई व गेवराई तालुका व्यापारी महासंघ यांचा गौरव करण्यात आला. यावेळी  मान्यवरांचा परिचय समाजसेवक सुभाष काळे यांनी दिला व राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न पुरस्कार सोहळ्याचे प्रास्ताविक सुरेश भोपळे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत शिवाजी झेंडेकर तसेच आभार डॉ. संजय पांढरे यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धर्मराज करपे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघर्ष सामाजिक धान्य बँकेचे संचालक बाळासाहेब गावडे, भारत साळुंखे. सुरेश नवले, भागेश्वर काळे यांनी सर्वत्र नियोजन पूर्णत्वास नेले. यावेळी सेवारत्न पुरस्कार प्राप्त मंडळीकडून संघर्ष धान्य बँकेच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्वच मंडलीची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विशेषत: सुभाष काळे यांच्या कामाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात आले. तसेच आपली या पुरस्कारासाठी निवड झाल्याने अणखी जबाबदारी वाढली असल्याने सामाजिक काम करण्यास बळ व प्रेरणा मिळाली असल्याने अणखी जोमाने काम करणार असल्याच्या भावना यावेळी पुरस्कृतांकडून व्यक्त करण्यात आल्या.

## पान १ वरून

### राष्ट्रवादीची दोरी...

पोटात एक आणि ओठात एक बोलू लागले. परंतु आपण सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री केलं. आपण योग्यवेळी योग्य निर्णय केला. आता, आपल्याला अजित पवारांच्या आदर्शावर पुढे जायचं आहे. आता आपण नव्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आपली वाटचाल करणार आहोत. आपण सर्वजण याठिकाणी एकत्र आलो आहोत. सगळ्या प्रांतातील लोकं याठिकाणी आले आहेत, असे म्हणत प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा केली. अजित पवारांनी मला राष्ट्रीय कार्याध्यक्ष केलं होतं. त्यांनी माझ्यावर एवढा मोठा विश्वास टाकला होता. पक्ष महाराष्ट्र आणि देशाच्या हितासाठी आम्ही काम केलं. राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून माझी आणि प्रदेश अध्यक्ष म्हणून तटकरे आणि भुजबळ मुश्रीफ आमची सर्वांची जबाबदारी होती आपला पक्ष आपण कशा प्रकारे पुढे घेऊन जाणार आहोत. मी ३५ वर्ष अजित पवारांचा मित्र म्हणून आज घोषणा करत आहे सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष केल जावं, असा प्रस्ताव प्रफुल पटेल यांनी मांडला. त्यानंतर, सर्वांनी हात उंचावत सहमती दर्शवली. तसेच, मी घोषणा करतोय की राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा अजित पवार यांची निवड करण्यात आली आहे, असे पटेल यांनी जाहीर केले.

### सुप्रिम कोर्टाचा...

त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करण्यास नकार दिला. दरम्यान, सुप्रीम कोर्टाने आज जरी जामीन नाकारला असला तरी वाल्मिक कराडला पुन्हा जामीनासाठी अर्ज करता येणार आहे. पण त्यासाठी वाट पाहावी लागणार आहे. कारण जर ट्रायल पुढे जात नसेल तर वर्षभरात पुन्हा वाल्मिक कराड सर्वोच्च न्यायालयात येऊ शकतो. या प्रकरणाची पहिली सुनावणी १९ फेब्रुवारी रोजी करण्यात आली होती. त्यानंतर आज या प्रकरणाची सुनावणी पार पडल्यानंतर सुप्रीम कोर्टाने हा जामीन अर्ज फेटाळला आहे. याआधी सुप्रीम कोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठात आणि बीड जिल्हा न्यायालयात वाल्मिक कराडचा जामीन अर्ज आणि दोष मुक्तीचा अर्ज फेटाळण्यात आला होता. सुप्रीम कोर्टातील आजच्या सुनावणीपूर्वी धनंजय देशमुख यांनी याबाबत कॅव्हेट दाखल केले होते. आमचे म्हणणे आम्ही न्यायालयात देणार असल्याचे देशमुख यांनी म्हटले होते.

### पोलीस पाटील भरती...

तक्रारीवरून बीड जिल्हा सुधारायला तयार नाही, हे स्पष्ट दिसत आहे. दरम्यान, माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने एक हजार सोळा उमेदवार पात्र ठरवून मुलाखतीसाठी यादी जाहीर केली होती. ही यादी त्यांनी पटलावर जाहीर केली. यानंतर अनेकांनी या यादीवर आक्षेप घेतले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांनी या यादीमध्ये तांत्रिक चुका झाल्याचे स्पष्ट करत मुलाखतीसाठी निवडलेल्या या उमेदवारांची यादी रद्द केली. यावरून मोठा गैरप्रकार समोर आला आहे. तांत्रिक कारण दाखवणे योग्य नाही. यादी जाहीर करताना ती जबाबदारीने जाहीर केली पाहिजे. मात्र ही जबाबदारी यादी जाहीर करताना कोठे हरवली होती ? हा देखील प्रश्न निर्माण होत आहे. तर दुसरीकडे परळी येथून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये एका महिलेने ज्या परीक्षा केंद्रावर होमगार्ड म्हणून नोकरी केली, त्याचवेळी होमगार्ड म्हणून ड्युटी बजावत असताना पोलीस पाटील पदासाठी परीक्षा दिल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात तक्रार देखील झालेली आहे. अशा अनेक गंभीर बाबी समोर आलीने स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले, तरच पात्र उमेदवारांची या पदावर निवड होणे शक्य होईल. अन्यथा प्रशासनावर जिल्हाधिकाऱ्यांनी भरोसा दाखवला, तर ते चुकीचे ठरेल. दरम्यान, या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे माहिती कळविण्यात आली. त्यांनी या सर्व प्रकारची सत्यता पडताळून पाहण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यापुढे या नोकर भरती मध्ये गैरप्रकार होऊ नयेत, अशी अपेक्षा आहे. बीड जिल्हा भ्रष्ट कारभाराने नेहमीच गाजत असतो. त्यामुळे पोलीस पाटील पदाच्या होणाऱ्या या मोठ्या भरती मध्ये पात्र उमेदवारच निवडले गेले पाहिजेत. भ्रष्ट मार्गाने यात निवड होऊ नये, यासाठी प्रशासनाबरोबरच जनतेने देखील दक्ष राहणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल, असे ड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### बारगजवाडीत मध्यरात्री...

ह्या व त्यांचे पती जेवण करून रविवार (दि २२) रोजी रात्री १० च्या सुमारास घरासमोरील पडवीत मागच्या घराला कुलूप लावून झोपले असता मध्यरात्री त्यांच्या घराची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील चार ग्रॅमचे वेलजोड अंदाजे किंमत ३३६१०,एक ग्रॅमचे हुजूर जोड अंदाजे किंमत ७६००, दोन ग्रॅमचे ४९ मणी अंदाजे किंमत १५४००,दिड ग्रॅमची बुगडी अंदाजे किंमत

## पान १ वरून

११६०० व १,००,००० लाख रुपये रोख रक्कम असा एकूण १,६८,२१० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना सोमवार (दि.२३) रोजी सकाळी ०६ च्या सुमारास मिसाळ दाम्पत्याच्या निदर्शनात आली.त्यानंतर शिरूर पोलिसांना घडलेल्या घटनेची माहिती देत अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पुढील तपास पो.अं.एस.जी.खाडे हे करत आहेत.

### श्रीक्षेत्र संस्थान...

ह.भ.प.संभाजी महाराज यांच्या आशिर्वादाने व संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या मार्गदशनाखाली आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचे वंशज सिंदखेडराजा येथील शिवाजीराजे जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याखानकार प्रा.यशवंत गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच रक्तदान शिबीर, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तरी श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड परीसरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवजन्मोत्सव समिती श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड यांनी केले आहे.

### भरदिवसा महिलेच्या...

उपचार घेऊन त्या गावाकडे परतत असताना, शेरी पुलावर मागून भरधाव वेगात आलेल्या दुचाकीवरील दोन अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे मिनी गंठण भरदिवसा लंपास केल्याची घटना बुधवार (दि.२५)रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास घडली.चोरट्यांच्या या ओढाताढीत महिलेचे स्कुटीवरील नियंत्रण सुटले आणि त्या नातीसह खाली पडल्या. यात त्यांना दुखापत झाली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.ह.भाऊसाहेब आहेर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### चला कागदोपत्री...

(शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले (बीड जिल्हाध्यक्ष इंटक  बीड), किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष विश्वकल्याण महिला सेवा भावी संस्था बीड), वृक्षप्रेमी अभिमान खरसाडे आदी उपस्थित होते. विविध सामाजिक कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले. दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एका दिवसात ३० लाख वृक्षलागवड केल्याचा दावा करण्यात आला होता. या मोहिमेसाठी जिल्हा प्रशासनाने तब्बल ४२ कोटी रुपयांचा खर्च केल्याचे सांगितले गेले. मात्र प्रत्यक्षात १० टक्केही झाडे जिवंत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या संदर्भात सखोल चौकशीची मागणी करत विविध आंदोलने करण्यात आली; परंतु प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे. दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी विधानसभेत आ. चेतन तुपे यांनी प्रश्न उपस्थित केला असता, त्यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी एका दिवसात ३० लाख नव्हे तर ६३ लाख वृक्षलागवड झाल्याचे आणि त्यापैकी ९६ टक्के झाडे जिवंत असल्याचे सांगितले. या विधानामुळे जिल्हा प्रशासनाकडून शासन व सभागृहाची दिशाभूल झाल्याचा आरोप करत आंदोलन छेडण्यात आले. डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनातून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### आ.नमिता मुंदडा...

(एमएसपी) होणारी खरेदी या प्रक्रियेत अधिक सातत्य राखण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे मजबूत करणे आणि प्रस्तावित ग्रीनफिल्ड महामार्गामुळे होणारा औद्योगिक विकास राज्याच्या अर्थव्यवस्थेला नवी गती देईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सौर ऊर्जा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण जीवनमान उंचावण्यास मदत होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी सुरू असलेल्या 'उमेद' अभियानाचे कौतुक करताना त्यांनी महिला सक्षमीकरणाच्या कक्षा अधिक रुंदावण्याची मागणी केली. आरोग्य सेवांची उपलब्धता आणि पर्यावरण रक्षणासाठी सुरू असलेल्या हरित महाराष्ट्र उपक्रमाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. राज्यातील औद्योगिक विकासासोबतच पर्यावरणाचे संतुलन राखणे ही काळाची गरज असून, सरकारने या दिशेने घेतलेले निर्णय आश्वासक असल्याचे मत त्यांनी मांडले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाच्या योजना पोहोचवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत त्यांनी प्रशासकीय स्तरावर काही सुधारणा सुचविल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# नाथषष्ठी यात्रोत्सव पूर्वतयारी बैठक

## भाविकांना स्वच्छता, सुरक्षा व सेवा द्यावी : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी



पैठण येथे होऊ घातलेल्या नाथषष्ठी यात्रोत्सवात भाविकांना स्वच्छता, सुरक्षा व सेवा द्यावी. त्यासाठी प्रशासनाने सज्ज असावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी आज पैठण येथे नाथषष्ठी यात्रोत्सवाच्या पार्श्वभुमिवर पूर्वतयारी बैठक घेतली. पैठण येथे दि. ५ मार्च रोजी प्रथेनुसार 'तुकाराम बीज' मुहूर्तावर संत एकनाथ षष्ठी यात्रा सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. दि. ९, १० व ११ मार्च दरम्यान षष्ठी, सप्तमी व अष्टमी पर्वावर यात्रा उत्सव साजरा होणार आहे. उत्सवाचे यंदा २२७ वे वर्ष आहे. उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, सहायक गटविकास अधिकारी राजेश कांबळे, जलसंपदा विभागाच्या दगडी धरण उप-अभियंता श्रद्धा निंबाळकर, मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत संत, नायब तहसीलदार कैलास बहुरे व राहुल सुर्यवंशी उपस्थित होते. 'पैठण येथे नाथषष्ठी यात्रा काळात पिण्याच्या पाण्यासाठी किमान २५ टँकर्स ३ दिवस अहोरात्र तैनात ठेवावे. स्वच्छता, विद्युत व वाहतूक व्यवस्था अद्यावत करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. तसेच पवित्र स्नानासाठी जायकवाडी धरणातून सोडण्यात येणारे पाणी, सार्वजनिक स्वच्छता, विद्युत व्यवस्था, फिरती स्वच्छतागृहे, गावाबाहेर तात्पुरते बसस्थानक व वाहतूक मार्गातील बदल याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले.

## थोडक्यात...

### मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (बीड) यांचा स्तुत्य उपक्रम ; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला येथे एका भव्य आणि मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला चिखला आणि परिसरातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सावरकरांचे देशासाठी असलेले योगदान आणि त्यांचे विचार यावर यावेळी मान्यवरांनी प्रकाश टाकला. 'राष्ट्रसेवा हीच ईश्वरसेवा' हा सावरकरांचा विचार अंगीकारत मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्यासाठी या शिबिराचे आयोजन केले होते.ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांपर्यंत आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा पोहोचवण्यासाठी आमची संस्था यापुढेही कटिबद्ध राहील, असा विश्वास संस्थेचा यावेळी उपस्थित संस्थेचे प्रमुख डॉ.स्नेहल मॅडम, डॉ.गायके सर, तेजस पवार, रोहन डोळस, गावकरी होते.

### महामार्गाच्या कामात तुटणारे वडाचे झाड रामनगरकरांनी वाचवले अन् जगवलेही !



बीड । प्रतिनिधी

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील रामनगर येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. त्यामुळे सर्व्हिस रोडला अडथळा ठरत असलेले गावातील अनेक वर्षांपासून उभे असलेले भलेमोठे वडाचे झाड तोडण्याची वेळ आली. मात्र रामनगर येथील ग्रामस्थांनी वेळीच सावध भूमिका घेत हे झाड तोडण्यापूर्वीच त्याचे प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला होता. ठरल्याप्रमाणे वडाच्या झाडाचे गावातीलच छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे प्रत्यारोपण करण्यात आले. अवघ्या महिन्याभराच्या काळात या वडाला हिरवीगार पालवी फुटली असून वडाचे झाड वाचवले आणि जगवलेही आहे. कित्येक वर्षे माणसांना सावली देणारे, पक्ष्यांना आसरा देणारे वडाचे झाड महामार्गाच्या कामामुळे तुटणार याचे मोठे दुःख होते. मात्र प्रत्यारोपण करण्याची संकल्पना ग्रामस्थांना सूचली आणि ती प्रत्यक्षात अंमलातही आणण्यात आली. वडाच्या झाडाचे प्रत्यारोपण केल्यानंतर त्याला लवकर पालवी फुटावी, ते जळू नये यासाठी त्याला नियमित पाणी, शेण खत टाकण्यात आले. प्रत्यारोपणानंतर अवघ्या एका महिन्यातच या वडाला नवीन पालवी फुटली आहे. त्यामुळे रामनगरकरांनी केवळ झाड वाचवले नाही, तर ते यशस्वीपणे जगवले असल्याचे स्पष्ट झाले आहे. गावकर्यांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण असून, हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमासाठी ग्रामस्थांसह उड्डाणपुलाचे काम करणारी मे.कालूवाला कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हरियाणा) कंपनीनेही मोलाचे सहकार्य केल्यामुळे त्यांचेही ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

### आरोग्य विभाग उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड यांच्या शिरपेचात मानाचा तुरा



#### ना. मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते डॉ. गायकवाड आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानीत

बीड । प्रतिनिधी

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना अंतर्गत राज्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या परिमंडळस्तरीय व जिल्हास्तरीय नोडल अधिकार्यांना वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात आला आहे. यावेळी उपसंचालक आरोग्य सेवा लातूरच्या डॉ.रेखा गायकवाड यांनाही या कार्यक्रमात उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्काराने सन्मानीत करण्यात आल्या आहेत. ना. मेघना बोर्डीकर यांच्यासह इतर मान्यवर व पदाधिकार्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला आहे. राज्यामध्ये उत्कृष्ट आरोग्य सेवा पुरविणार्या संस्था, अधिकारी व कर्मचारी यांचा दरवर्षी शासना मार्फत वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात येतो. दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान राबविण्यात आले. अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हा व परिमंडळ स्तरावर एका महिला नोडल अधिकार्याची नेमणूक करण्यात आली होती. या अभियाना अंतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्या राज्यातील एका परिमंडळ स्तरीय नोडल अधिकार्याची आणि तीन जिल्हास्तरीय नोडल अधिकार्यांची कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात आला. यामध्ये लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड यांचाही काल सन्मान करण्यात आला आहे. डॉ. रेखा गायकवाड यांना उत्कृष्ट कार्याबद्दल मिळालेल्या पुरस्काराचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## द. बा. घुमरे पब्लिक स्कूल बीड शाळेचे एन. एम. एम. एस शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीराजे शिक्षण प्रसारक मंडळ पारगांव (घुमरा) संचलित द. बा. घुमरे पब्लिक स्कूल बीड या शाळेने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा एन. एम. एम. एस २०२५-२६ या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये शाळेतून एकूण ४६ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या परीक्षेत या शाळेतून चि. बोबडे अजित आत्माराम याने १४२ गूण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला तर कु. गायकवाड प्राची बाजीराव हिने १३९ गुण घेऊन व्दितीय क्रमांक मिळवला तर चि. भोसले अथर्व अविनाश याने १३६ गूण घेऊन तृत्तीय कमांक मिळवला चतुर्थ क्रमांक कु. नाईकवाडे राधा रोहित १३५ गुण, तर पाचवा क्रमांक कु. आदमाने अनुष्का अनिल १२९ गूण, त्यानंतर चि. काकडे समर्थ सिध्देश्वर १२५ गूण, चि. डावकर आदित्य अंगद १२४ गूण, चि. आहेरकर विनायक अनंता १२४ गूण, चि. गव्हाणे आर्यन बालासाहेब १२४ गूण, चि. गुंदेकर यशवंत हनुमंत १२३ गूण, कु. लाड तनुजा राधेशाम १२० गूण, चि. माने सार्थक रमेश ११९ गुण, चिं. गोरे श्रेयश तेजस ११५ गूण, चिः घोडके श्रेयश संजय ११३ गूण, चि. भिल्लारे अभय अशोक ११३ गुण, कु. कोटुळे दिव्या प्रताप १०७ गूण, चि. नवले आदर्श किशोर १०७ गूण, कु. लोंढे वैष्णवी मनोज १०७ गूण, कु. घाडगे आर्या बाबू १०६ गूण, कु. घाडगे पुर्वा हनुमान १०५ गूण, चि. खटाणे गौरव पवनकुमार १०३ गूण, चि. करडूले योगेश पिंटू १०३ गूण, चि. व्यवहारे समर्थ बाजीराव १०२ गूण, कु. डावकर कल्याणी अमर १०२ गूण, चि. शेळके सुमीत संतोष ९९ गुण, चि. जाधव सोहम सुभाष ९६ गूण, चि. शेळके ओमकार गोविंद ९३ गूण, कु. बोबडे स्वप्नजा बबन ९२ गूण, चि. हाडुळे संकेत सतिश ९१ गूण, कु. गुजर शिक्षा अर्जून ९० गूण, चि. गाडे अवनिश अशोक ९० गूण, इत्यादी विद्यार्थी या परीक्षेत ९० पेक्षा जास्त गूण घेऊन उत्तीर्ण झाले. तसेच इतर ९ विद्यार्थी ९० पेक्षा कमी गूण घेऊन उत्तीर्ण झाले. असे एकूण ४६ पैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या परीक्षेसाठी संस्थेचे सचिव श्री. दिपक दादा घुमरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सहशिक्षक श्री. सानप ए. एस, श्री. देवडे व्हि. डी, श्री. शिंगटे ए. बी, श्री. पवार एस. बी यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर असे अभ्यासक्रमाचे अध्यापन व मार्गदर्शन केले, तसेच विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास केला व त्यांच्या मोठ्या प्रमाणात परीक्षा घेण्यात आल्या त्यामुळे शाळेतील विद्यार्थी यशस्वी झाले. शाळेच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव मा. श्री. दिपक दादा घुमरे सर, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती. घुमरे एम. डी मॅडम माध्यमिक विभागाचे मु. अ. श्री. शेंडगे एम. आर तसेच परीक्षा विभाग प्रमुख प्रवार एस. बी विषय मार्गदर्शक शिक्षक श्री. सानप व्हि. एस, श्री. देवडे एस. व्ही, श्री. शिंगटे ए. बी, शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थी पालक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भारतीय मूर्तिशास्त्र आणि स्थापत्यकला यांचे संवर्धन होणे ही काळाची गरज: अरविंद सोनटक्के



बीड । प्रतिनिधी

भारतीय मूर्तिशास्त्र आणि प्राचीन स्थापत्यकला यांच्यामुळेच खऱ्या अर्थाने इतिहास वाचता येतो. इतिहासातील अनेक अबोध घटना प्रसंगाचे आणि सांस्कृतिक घडामोडींचे अन्वयार्थ लावता येतात. त्यामुळे प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्राचे आणि स्थापत्यकलेचे संवर्धन होणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक डॉ. अरविंद सोनटक्के यांनी केले. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सौ. के.एस. के. महाविद्यालय बीड आणि भारतीय मूर्ती व स्थापत्य संशोधन परिषद , पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'शिल्पस्पर्श' - भारतीय मूर्तिशास्त्र आणि स्थापत्य या विषयावरील एकदिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव तथा ख्यातनाम लेखिका डॉ. दिपा क्षीरसागर प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, इतिहास अभ्यासक डॉ. कामाजी डक, डॉ. शांता जाधवर, उपप्राचार्य तथा कार्यशाळेच्या संयोजक डॉ. अनिता शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले, मूर्तिकला, शिल्पकला अथवा स्थापत्य या केवळ दगडात कोरलेल्या मूर्ती अथवा शिल्प नसतात. तर त्यामध्ये त्या कलावंताने आपला जीव ओतलेला असतो. त्यामुळे त्यांना सेंद्रीयत्व प्राप्त झालेले असते. या मुर्ती आणि शिल्प यांना स्वतः चे म्हणून एक प्रमाण असते. ओळख असते. गतकाळात घडून गेलेल्या अनेक महत्त्वपूर्ण घटनांची उकल आपणास यातून होत असते. इतिहासातील अनेक नवे सांस्कृतिक-ऐतिहासिक संदर्भ यामुळे नव्या अर्थबोधासह आपल्याला माहीत होत असतात. आपला हा ऐतिहासिक-सांस्कृतिक वारसा आहे. या वारशामुळेच आपली जगाला ओळख होत असते. यामुळे या ऐतिहासिक घटकांचे संवर्धन होणे महत्त्वाचे ठरते.

## NMMS परीक्षेच्या निकालात लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालय अग्रेसर

### २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र, सत्कार समारंभ उत्साहात

लिंबागणेश । प्रतिनिधी



भारत सरकारतर्फे घेण्यात येणाऱ्या National Means-cum-Merit Scholarship (NMMS) परीक्षेच्या निकालात बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून विद्यालयाने तालुक्यात आपला ठसा उमटवला आहे. NMMS ही परीक्षा आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने घेतली जाते. ही परीक्षा इयत्ता ८ वीतील विद्यार्थ्यांसाठी असते. परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वी दरम्यान दरवर्षी १२,००० म्हणजेच दरमहा १,००० शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी मोठा आधार ठरते. या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण होते, आत्मविश्वास वाढतो आणि उज्ज्वल भविष्याची प्रेरणा मिळते. तसेच ही परीक्षा विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि शैक्षणिक क्षमता तपासणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी रोजी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक अंगद हावळे व इतर सहशिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशासाठी दादासाहेब सुपेकर, राहुल रसाळ, गणेश आजबे, गणेश घरत आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## तामिळनाडू येथे पार पडलेल्या नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये (Roll ball) या स्पर्धे मध्ये तिसरा क्रमांक

बीड । प्रतिनिधी



नुकतीच तामिळनाडू येथे पार पडलेल्या नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये (Roll ball) या स्पर्धे मध्ये तिसरा क्रमांक पटकावून महाराष्ट्र टीम कु. स्वरा सचिन सानप यांनी यशाचे शिखर गाठले आहे, याबद्दल टीमचे आणि तिचे खूप खूप अभिनंदन! या नेत्रदीपक कामगिरीबद्दल आणि कठोर मेहनतीबद्दल आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. तुझी मेहनत, जिद्द आणि चिकाटीला सलाम.तुम्ही सर्वांनी मिळवून घरच्यांचा आणि राज्याचा मान वाढवला आहे. हे यश तुमची कठोर मेहनत आणि समर्पणाचे फळ आहे. अभिनंदन! पुढील यशासाठी खूप खूप शुभेच्छा.

## जिल्हास्तरीय कृषि विद्यापीठाच्या आंतर कृषि तंत्र विद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सोनाजीराव क्षीरसागर कृषी तंत्र विद्यालयाचे वर्चस्व

### कबड्डी, खो-खो, आणि रस्सीखेच स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी मान्यताप्राप्त शासकीय घटक कृषि तंत्र विद्यालय,अंबाजोगाई आणि सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालय,राजुरी (नवगण) (सहसंयोजक: आष्टी, दासखेड, देवगाव आणि लुखामसला) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कृषि विद्यापीठाच्या बीड जिल्हास्तरीय आंतर कृषि तंत्र विद्यालयीन क्रीडा महोत्सव' २०२६ अंतर्गत दि २४ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या क्रीडा महोत्सवात सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालयाच्या खेळाडूंनी अष्टपैलू कामगिरी करत कबड्डी, खो-खो आणि रस्सीखेच खेळात तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारात गोळफेक आणि ४०० मीटर घावणे यामध्ये प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले.हा भव्य क्रीडा महोत्सव सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (सौ.के. एस.के.) ऊर्फ (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड बीड येथे पार पडला.या सोहळ्याचे उद्धघाटन व पारितोषक वितरण सोहळा व.ना.म.कृ. वि. परभणीचे संचालक तथा अधिष्ठाता (कृषि) मा. डॉ. भगवान आसेवार, प्रमुख पाहुणे सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) डॉ.गजेंद्र लोंढे हे होते तसेच श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके आणि शासकीय घटक कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर खळगे तसेच सर्व कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी व्यासपीठावर जिल्ह्यातील विविध कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य प्रा.येवले विजय (लुखामसला) प्रा.शेख फैयाज (देवगाव),प्रा. सानप जयदीप (आष्टी), प्रा.लाळगे गोवर्धन (दासखेड) तसेच सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य प्रा.सतीश पोकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याचे औचित्य साधून सौ. के. एस. के (काकू) कृषि महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. रेणुका बागलाने हिची नुकतीच कृषि उपसंचालक पदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला. तिच्या या यशामुळे उपस्थित विद्यार्थी खेळाडूंना एक नवी प्रेरणा मिळाली.

बीड येथील म्हसोबा फाटा परिसरातील सौ.के.एस.के. कृषि महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या या क्रीडा महोत्सवात जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांनी आपला क्रीडा अविष्कार सादर केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण ,राजुरी (नवगण) या संस्थेचे सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तसेच या क्रीडा स्पर्धे साठी पंच म्हणून लाभलेले डॉ काळे,डॉ. चौघुले डॉ. घोडके, डॉ. आवारे आणि श्री राहुल बन यांनी विशेष परिश्रम घेतले.कबड्डी, खो-खो आणि रस्सीखेच या महत्त्वाच्या सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारात गोळफेक आणि ४०० मीटर घावणे यामध्ये सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावल्याबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री मा. जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके प्राचार्य सतीश पोकळे,प्रा. राठोड डी.बी,प्रा. मिसाळ डी.आर,प्रा.राजगुरू ए.के,प्रा.पाटील पी.जी, दोडमिसे अनिकेत आणि परदेशीं गणेश यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ ●

# केज मतदारसंघात अवकाळीचा तडाखा

## नुकसानभरपाईसाठी आमदार नमिता मुंदडा यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी सरकारकडे धाव घेतली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करून त्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांना पत्राद्वारे केली आहे.

२२ आणि २३ फेब्रुवारी २०२६ रोजी केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यात अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, बाजरी आणि भाजीपाला पिके अक्षरशः भुईसपाट झाली आहेत. काढणीस आलेली पिके शेतातच आडवी पडल्याने आणि पावसामुळे ओली झाल्याने त्यांची प्रत खालावली आहे. अनेक ठिकाणी मळणीसाठी काढून ठेवलेले पीक भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, वादळी वाऱ्यामुळे आंबा बागांनाही मोठा फटका बसला आहे. आधीच बाजारभाव समाधानकारक नसल्याने आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास या पावसामुळे हिरावला गेल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाने या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बाधित भागांत तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी आग्रही विनंती आमदार मुंदडा यांनी पत्रातून केली आहे.

## थोडक्यात...

### जगद्गुरु संत तुकोबाची अभंगवाणी कार्यक्रम साजरा



**बीड । प्रतिनिधी**

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज, विठ्ठल रुक्मिणी मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा निमित्त वाघोली पुणे येथे तुकोबाची अभंगवाणी सादरकर्ते युवारत्न शिवाजी डाके व प्रदुम्न रसाळ यांनी अलका पुरी पुण्य ,जय जय राम कृष्ण हरी,रूप पहाता लोचनी, सुंदर ते ध्यान उभे विटेवरी,जय जय विठ्ठल रखुमाई या वारकरी पंचपदीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेनजी जोशी यांनी अजरामर केलेली अभंग आता कोठे धावे मन, इंद्रायणी काठी देवाची आळंदी,पंढरी निवासा सख्खा पांडुरंगा,बाजे मुरलीया बाजे, तिर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल अशा अनेक प्रचलित भजनांनी रसीकांची मने जिंकली. तदनंतर रसाळ यांनी अवघे गर्जे पंढरपुर तर शिवाजी डाके यांनी कानडा राजा पंढरीचा या भजनाने विठ्ठलाच्या भजनात रसिक श्रोते तल्लीन झाले. शेवटी पावलो पंठरी,अगा वैकुंठीचा राया या भैरवी ने बहारदार सांगता झाली. तेवढीच तबल्यावर उत्तम साथ आदेश जाधव यांनी दिली तर तेवढ्याच ताकतीने मयुर लोहार यानी पखवाजाची साथ केली. निखिल लोहार ने टाळ साथ केली. समाजसेविका मिनाकाकी सातव, नवनाथ सातव,कैलास महाराज सातव यांची उपस्थिती लाभली.

### तिर्थक्षेत्र मोग–यात पंढरी अवतरली – रविवारी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील तिर्थक्षेत्र मोगरा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा मागील बारा वर्षापासुन आयोजित केला जातो. यंदाही दि. २२ फेब्रुवारीपासुन सप्ताहास सुरूवात झाली असुन विवीध धार्मिक कार्यक्रमांनी पंढरी अवतरल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दि. १ मार्च २०२६ रविवारी ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. तालुक्यातील तिर्थक्षेत्र मोगरा येथे ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री, शि. भ. प. शिवाजी म. भरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात कथा प्रवक्ते ह.भ.प. बाळु म. उखळीकर हे असुन तबला साथ दौलत म. वगरे, हार्मोनियम वादक परमेश्वर महाराज, गायक ह.भ.प. शिवाजी म. देवकते, बुलबुल वादक जय म. सकळकर यांची साथसंगत आहे. ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प. सौ. बबीताताई महालिंग भरडे, सौ. सुनिता सतिष पांचाळ, सौ. सरोजताई सुधाकर गोसावी, काकडा नेतृत्व ह.भ.प. गोपाळ म. देशमुख, शाहुराव सातपुते, बाबुराव शेजुळ, दौलत म. वगरे, रामहारी शिंदे, संदिपान माकले, विठ्ठल पांढरपोटे, नवनाथ सावंत, सतिष पांचाळ, चत्रभुज खामकर, महालिंग भरडे, नवनाथ इंगळे, श्रीपती नाईकनवरे, खंडु मोरे, महादेव सावंत, श्रीहरी शिंदे हे तर हरिपाठ नेतृत्व ह.भ.प. सचिन म. काष्टे, दौलत म. वगरे, उमेश. हाके हे करत आहेत. यात पहिल्या दिवशी ह.भ.प. कालिदास म. नाईकनवरे यांचे तर ह.भ.प. अनिल म. माखले, ह.भ.प. माउली म. खडकवाडीकर, ह.भ.प. भागवत म. नखाते, ह.भ.प. राजेंद्र म. गोंदीकर यांचे हरिकिर्तन झाले असुन ह.भ.प. सोनालीताई फडके, ह.भ.प. मुकूंद महाराज गात यांचे हरिकिर्तन होणार आहे तर दि. १ मार्च २०२६ रविवारी ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन या महाप्रसादाचा लाभ भाविक – भक्तांनी घ्यावा असे आहे संतोष शेठ दुगड बंधु व समस्थ ग्रामस्थ मोगरा यांचे वतीने करण्यात आले आहे तर पंचक्रोषीतील अनेक भावीक भक्त, महिला, पुरूष मंडळी या सत्संगाचा लाभ घेत आहेत.

### अहिल्यानगर महानगर पालिकेत नागरगोजे झाले स्विकृत नगरसेवक



**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगर पालिकेच्या स्विकृत नगरसेवकपदी बाबुसेठ नागरगोजे यांची निवड झाली आहे. त्यांच्यासह पाच स्विकृत नगरसेवकांच्या नावांची महापौर ज्योती अमोल गाडे यांनी काल गुरुवारी घोषणा केली. बाबुसेठ नागरगोजे हे बीड जिल्ह्यातील मानूर या गावचे सुपुत्र आहेत. तसेच उद्योग क्षेत्रामध्ये त्यांनी गरुडझेप घेतलेली आहे. त्यांच्या या निवडीचे अहिल्यानगरसह बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी जोरदार स्वागत होत आहे.बाबासाहेब संतोष नागरगोजे (बाबुसेठ) यांनी नुकतीच अहिल्यानगर महानगर पालिका निवडणूक लढवली होती. दुर्दैवाने त्यांचा फक्त ४४ मतांनी पराभव झाला होता. त्यांचा हा पराभव अनेकांच्या जिव्हारी लागला. सर्वात महत्वाचे म्हणजे अहिल्यानगरचे लोकप्रिय आ.संग्रामभैय्या जगताप यांना या पराभवाची मनामध्ये खंत होती.कारण जगताप यांच्या नेतृत्वाखाली बाबुसेठ तसेच त्यांचे बंधु लिंबासेठ नागरगोजे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रामध्ये अग्रगण्य असलेल्या नागरगोजे बंधुंनी संग्राम भैय्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पहिल्यांदा पक्षीय राजकारणात प्रवेश केला. मात्र त्यांचा पराभव झाल्याने आ.जगताप यांच्या मनात खंत होती. अखेर त्यांनी स्विकृत नगरसेवकाच्या निमित्ताने नागरगोजे बंधुंना दिलेला शब्द खरा करुन दाखवला.

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचे विचार तरुणांनी आत्मसात करावेत भाजपा नेते : नवनाथ अण्णा शिराळे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी बीड शहरातील प्रसिद्ध असलेल्या जव्हार कॉलनी या ठिकाणी साजरी करण्यात आली याच अनुषंगाने बीड येथील भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत उपस्थित सावरकर प्रेमींची मन जिंकले व आपले अभ्यासपूर्वक मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना अण्णा म्हणाले की स्वतंत्र वीर विनायक दामोदर सावरकर यांनी नाशिक जिल्ह्यातील छोट्याशा भगूर गावी जन्म घेऊन इंडियाच्या इतिहासामध्ये नाव आणण्याचे उल्लेखनीय कार्य आपल्या क्रांतिकारी कार्यातून करून देशासमोर एक आदर्श निर्माण केला त्यांनी २८ वर्ष अंदमान निकोबार या ठिकाणी भारत देशासाठी कारागृहामध्ये काळे पाण्याची शिक्षा भोगली असे विविध भारत देशासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी आपल्या हाडाची काड करून हिंदुत्व तैवत ठेवलं असे कट्टर व प्रखर हिंदुत्ववादी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील भाजपा नेते बीड यांनी विनम्र अभिवादन केले व उपस्थितांना स्वतंत्र वीर विनायक दामोदर सावरकरांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत अमोल असे मार्गदर्शन केले व पुढे बोलताना ते म्हणाले की आजची तरुण पिढी ही उद्याचे देशाचे भविष्य आहे त्यांनी विनायक दामोदर सावरकर उत्कृष्ट क्रांतिकारी विचार आत्मसात करावेत असे अनमोल मार्गदर्शन मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी उपस्थित असलेल्या सावरकर प्रेमी यांना केले या वेळी येथे उपस्थित असलेले लोकशाही पत्रकार संघाचे सर्वेसर्वा मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब माजी नगरसेवक बाबुराव परळकर प्रवीण चव्हाण हरिभक्त परायण राजू लोखंडे महाराज पत्रकार नंदा भंडारे तसेच महाराष्ट्र लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच योगेश नाकाडे साहेब सह बीड शहरातील सावरकर प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वकिलास मारहाण; आरोपीला तीन दिवसाची पोलीस कोठडी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा न्यायालय परिसरात ॲड. राम डोंगरे यांना मारहाण केल्याचा प्रकार मंगळवारी घडला होता. वकील संघाने आंदोलनाचे हत्यार उपसल्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल झाला. या प्रकरणातील आरोपी राधाकिसन करपे याला पोलिसांनी अटक केली. न्यायालयासमोर हजर केल्यानंतर त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. मंगळवारी दुपारी बाराच्या सुमारास राधाकिसन करपे याने काही महिलांना सोबत घेऊन येत एड. राम डोंगरे यांना मारहाण केली. या प्रकरणाची तक्रार वकील संघाने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिली. मात्र आरोपीचे पोलिसांशी असलेले हितसंबंधाच्या कारणावरून गुन्हा नोंद करण्यास पोलिसांकडून टाळाटाळ केली जात होती. या प्रकरणात वकील संघाने एकजूट दाखवत न्यायालयीन कामकाजात सहभाग घेणार नसल्याचे जाहीर करून न्यायालयाच्या पायऱ्यावर बसून बुधवारी आंदोलन केले. त्यानंत मोर्चा शिवाजीनगर पोलीस ठाण्यावर नेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील तक्रार करण्यात आली. सगळीकडून दबाव वाढल्यानंतर पोलीस यंत्रणा तळ्यावर आली २७ तासानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपी राधाकिसन करपे याला अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## अभिनव पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

### छावा थीमने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले



**छावा थीमने प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी**

**अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी धर्मवीर संभाजी राजे यांच्या जीवनातील एका प्रसंगावर सादर केलेल्या छावा थीम मुळे प्रेक्षक माता पालक यांच्या अंगावर काटा तर डोळ्यात पाणी आले.उपस्थित सर्वच माता पिता पालकांनी शाळेतील विद्यार्थी,शिक्षक यांचे भरभरून कौतुक केले.**

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

अभिनव पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी विद्यालयातील नवरत्नांनी केलेली धमाल व धर्मवीर संभाजी राजे यांच्या जीवनावर आधारित थीमने प्रेक्षकांची मने जिंकली. या भव्य दिव्य सांस्कृतिक सोहळ्याचे अध्यक्षस्थान पांडुरंग चांडक (अध्यक्ष फ्लाईंग बर्ड अकॅडमी) यांनी भूषवले तर उद्घाटक म्हणून नागसेनजी कांबळे (अध्यक्ष फिनिक्स इंटरनॅशनल स्कूल आष्टी) हे होते. तर सौ विजयश्री दराडे, ॲड.विकास मिसाळ,गणेश घायतिडक,सोमनाथ लटपटे, दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पत्रकार प्रकाश काशीद, पत्रकार संतोष स्वामी,पत्रकार नवनाथ कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थती होती. संस्थेचे अध्यक्ष अभिमान पारेकर, गणेश गटकळ, गणेश लाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या राहुल राऊत, बालकीसन कटारे, मंदाकिनी कटारे, पार्वती चव्हाण, गीता आटकरे यांच्यासह शिक्षक वृंदांनी मुलांची तालीम व सराव करून घेतल्याने स्नेहसंमेलन यशस्वी झाले.

## जबरी चोरी करणारे ४ आरोपी गुन्हे शाखेने पकडले



**बीड । प्रतिनिधी**

ऑनलाइन पैसे टाकतो असं सांगून मोटार सायकलवर बसवून घेऊन जात त्याची लूट करणाऱ्या चौघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले आहे. या प्रकरणात पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून शेख इम्रान दस्तगीर, वय २८ वर्ष, रा होळ याला त्याच्या मित्रांने ऑनलाइन पैसे पाठव म्हणून सांगितले होते. परंतु ऑनलाईन पैसे नसल्यामुळे तो आडस फाटा येथील एका बियर बार समोर थांबून विचारपूस करत होता.यावेळी तीन तरुण मोटार सायकल वरून या ठिकाणी आले. शेख इम्रान यास ऑनलाइन पैसे टाकतो असं सांगून मोटार सायकल वर बसवले.आडस रोडला घेवुन जावुन त्याच्याकडील पैसे व मोबाईल हिसकावुन घेवुन पळुन गेले. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात ३०९(४), ३(५) बी.एन.. एस प्रमाणे दि. ७ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीस गून्हयातील आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान गुप्त बातमीदाराकडून स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हा हा सुमित अरुण गायकवाड व त्याचे साथीदारासह केला असुन ते सध्या अंबाजोगाई येथे असल्याची माहीती मिळाली.प थकाने अंबाजोगाई शहर परीसरातुन गुन्हयातील आरोपी सुमित अरुण गायकवाड, वय २० वर्ष, रा पंचशिल नगर अंबाजोगाई, विनय गोविंद जगधने, वय १९ वर्ष, रा संभाजीनगर अंबाजोगाई, विश्वजीत विश्वास गंडले, वय १९ वर्ष, रा लाल नगर अंबाजोगाई व शिवम जनक कसबे, वय १९ वर्ष, रा आर्मी कॉलनी अंबाजोगाई यांना ताब्यात घेवुन त्यांच्या कडून बळजबरीने चोरुन नेलेला मोबाईल व गुन्हयात वापरलेली दुचाकी मोटार सायकल जप्त करुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांच्या ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास अंबाजोगाई शहर पोलीस करीत आहेत.हि कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड

## NMMS परीक्षेत बाळनाथ विद्यालयाची दिमाखदार कामगिरी; विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी



**बीड । प्रतिनिधी**

एन एम एम एस चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालयाने घवघवीत यश संपादन करत ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. या परीक्षेत शाळेतून प्रथम क्रमांक अमर सतीश ताटे, द्वितीय क्रमांक जानवी जीवन करपे, तर तृतीय क्रमांक अदिती अशोक कदम यांनी मिळवला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे. कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले. शाळेची गुणवत्ता उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांचे वाचन वाढावे आणि ज्ञानाचा विस्तार व्हावा यासाठी सुसज्ज वाचनालयाची उभारणी करण्यात आली आहे. पुढील काळातही या शाळेतून अनेक यशस्वी विद्यार्थी घडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ग्रामीण भागात शैक्षणिक चळवळ उभी करण्याचे आणि शाळा सक्षम करण्याचे कार्य मा. विनायकराव मेटे यांनी केले आहे. त्यांच्या प्रेरणेने शाळा सातत्याने प्रगतीपथावर आहे. विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांनी केले. या यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कारासाठी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी डॉ. ज्योतीताई मेटे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पांढऱ्याचीवाडी गावचे माजी सरपंच नितीन बप्पा ताटे, चाकरवाडीचे सरपंच विनोद कवडे, पत्रकार अभिजीत पवार, माजी विद्यार्थी डॉ. आदित्य चौधरी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक जगताप सर यांनी केली. त्यांनी एन एम एम एस ही विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची स्पर्धा परीक्षा असून, अशा परीक्षांमुळे आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती वाढते, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन मांजरे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन दाईगडे सर यांनी केले. बाळनाथ विद्यालयाच्या या यशामुळे चाकरवाडी परिसरात शैक्षणिक प्रेरणा निर्माण झाली असून, भविष्यातही यशाची ही परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त होत आहे.